MHRG190008732023

:: **<u>भुसंपादन निर्देशन अर्ज क्रमांक १४१/२०२० मधील निशाणी क्र.२९ वरील आदेश</u>** ::

प्रस्तुत अर्जाने अर्जदार यांनी मुल्यमापक श्री.मिलींद जाधव यांची उर्वरित साक्ष नोंदविण्याची परवानगी मिळणेसाठी विनंती केली आहे.

०२. अर्ज व सामनेवाला क्र.३ यांनी दिलेले म्हणणे वाचले. अर्जदार व सामनेवालातर्फे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

०३. अर्जदार यांचे कथन की, मुल्यमापक श्री.मिलींद जाधव यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केले आहे परंतु सदर साक्षीदाराचा अतिरिक्त सरतपास आणि उलटतपास मागील तारखेस नोंदविण्याचे राहुन गेले होते. त्यानंतर अर्जदारतर्फे अनावधानाने पुरावा बंद पुरसिस दाखल करण्यात आली. सबब, सदर साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची परवानगीची विनंती केली आहे.

०४. सामनेवालातर्फे अर्जास तीव्र आक्षेप नोंदविण्यात आला.

०५. उभय पक्षातर्फे करण्यात आलेल्या युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. प्रस्तुत अर्जान्वये अर्जदाराने भुसंपादित जमिनीच्या वाढीव मोबदल्याची मागणी केली आहे. अर्जाचे स्वरुप पाहता अर्जदार व सामनेवाला यांचे प्रस्तुत वादामध्ये आर्थिक हितसंबंध गुंतलेले असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार यांनी हेतुपुरस्सर पुरावा बंद केलेला नसुन नजरचुकीने

पुरावा बंद पुरसिस दाखल केल्याचे दिसुन येते. अर्जदार यांचेतर्फे साक्षीदाराचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले असुन साक्षीदाराचा उर्वरित सरतपास व उलटतपास नोंदविणे बाकी आहे. सदर साक्षीदाराची साक्ष नोंदविण्याची अर्जदारास संधी देणे न्यायोचित ठरते. याकारणास्तव, चर्चिल्या बाबी लक्षात घेता अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो, असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारित करण्यात येतो.

:: **आदेश** ::

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांना निशाणी क्र.२२ वरील साक्षीदाराची साक्ष नोंदविण्याची परवानगी देण्यात येते.

३. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

JADHAV HEMLATA RAVINDRA

Digitally signed by JADHAV HEMLATA RAVINDRA
Date: 2026.03.24 11:27:30 +0530

महाड, (**श्रीमती एच. आर. जाधव**)
दिनांकः२३.०३.२०२६ दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, महाड